**प्रेसनोट** **दिनांक ३१/०३/२०१९**

## दत्तवाडी पोलीस ठाणे

## खुनातील फरार अट्टल गुन्हेगारास दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद

दि.२४/०३/२०१९ रोजी पो. हवा. रविंद्र फुलपगारे यांना त्यांचे खास बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, "जनता वसाहत येथील निलेश वाडकर याचे मर्डर मधील फरार आरोपी योगेश ऊर्फ नुन्या पवार हा तळजाई टेकडी येथे एका पानटपरी जवळ थांबलेला आहे." त्याप्रमाणे त्यांनी सदरची बातमी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ यांना कळविली असता त्यांनी तत्काळ सदरची बातमी वपोनि देविदास घेवारे व पोनि (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांना कळविली असता त्यांनी तत्काळ खात्री करुन कारवाई करावयाचे आदेश दिलेने पोलीस उपनिरिक्षक कुलदीप संकपाळ यांनी तपासपथकाचे स्टाफसोबत सदर बातमीचे ठिकाणी म्हणजे तळजाई टेकडी येथे जावुन स्टाफच्या दोन टिम तयार करुन सापळा रचुन सदरचे फरारी आरोपी नामे योगेश ऊर्फ नुन्या शशिकांत पवार वय. २७ वर्षे, रा. गल्ली नं. ८, जयभवानीनगर वरचा टप्पा, जनता वसाहत पुणे याला अत्यंत शिताफीने पकडले असुन त्यास पोलीस ठाणे येथे आणुन दाखल गुन्हयात अटक केली आहे. तसेच त्यास मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास सात दिवसांची पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केली आहे.

सदरची कारवाई मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ पो हवा रविंद्र फुलपगारे, पो.हवा. तानाजी निकम, पो हवा श्रीकांत शिरोळे, पो ना सुधीर घोटकुले, पो ना सोमेश्वर यादव, पो ना महेश गाढवे, पो ना कुनाल माने, पो शि सागर सुतकर, पो शि शिवाजी क्षीरसागर, पो शि अमित सुर्वे, पो शि अक्षयकुमार वाबळे, पो शि शरद राऊत, पो शि विकास कदम, पो शि राहुल ओलेकर, पो शि अमोल लोहार, पो शि आदिनाथ देवकर यांनी केली असुन पुढील तपास श्री बाजीराव मोहीते मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो, सिंहगड रोड विभाग पुणे शहर हे स्वतः करीत आहेत.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे